# सर्व्हाइव्हिंग मेन

## चतुर स्त्रियांसाठी मार्गदर्शक


**शोभा डे**

अनुवाद

**सुप्रिया वकील**



**रिया पब्लिकेशन्स्**

६७८-ई, शामराव विठ्ठल बँकेच्याशेजारी,
शाहूपुरी दुसरी गल्ली, कोल्हापूर - ४१६००१.
riyapublications@gmail.com
www.ajabgroup.com

Surviving Men : Shobhaa De
Marathi translation by Supriya Wakil
First published in English by Penguin Books India 1997
Copyright © Shobhaa De 1997
First published in Marathi by Riya Publications in arrangement with Penguin Books India.

**सर्व्हाइव्हिंग मेन :** शोभा डे

अनुवाद : सुप्रिया वकील

**प्रकाशक**
रिया पब्लिकेशन्स्,
६७८-ई, शामराव विठ्ठल बँकेच्याशेजारी,
शाहूपुरी दुसरी गल्ली, कोल्हापूर - ४१६००१.
riyapublications@gmail.com
www.ajabgroup.com

**अनुवाद**
सुप्रिया वकील
supriyawakil@gmail.com

**अक्षरजुळणी**
अजब ग्राफिक्स

**मुखपृष्ठ**
चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर

**मुद्रक**
ऋग्वेद प्रिंटर्स, पुणे

**आवृत्ती**
ऑगस्ट २०१६

**किंमत**
₹ २५०/-

दिलीप...

मला ‘सर्व्हाइव्ह’ केल्याबद्दल...

## प्रस्तावना

सामान्य, निरोगी स्त्रीला आयुष्यात जवळजवळ तीस वर्षं पाळीच्या कळा सोसत जगावं लागतं. एवढा काळ तरी नक्कीच. म्हणजे तीनशे साठ महिने दरमहा चार दिवस तिला हे सोसावं लागतं... म्हणजे साधारण चौतीस हजार पाचशे साठ तास अस्वस्थतेत आणि कंटाळवाणी वेदना सोसत तिला जगावं लागतं. या गोष्टीची आणि तिच्या पुरुषासोबतच्या आयुष्याची तुलना करून बघा. तितक्याच काळासाठी. तीच वेदना. तिला जर पर्याय असता तर ती त्यातल्या कशाला सोडचिठ्ठी देईल–पुरुष का पाळीच्या कळा? मला वाटतं, याचं उत्तर तुम्हाला माहीत आहे.

बायका म्हणजे विचित्र प्राणी असतात. त्या त्यांच्या 'पीएमएस'बद्दल पझेसिव्ह असतात. तशाच त्या त्यांच्या पुरुषांबद्दलही पझेसिव्ह असतात. पण पाळीच्या कळा एकदाच्या टळतात तरी... पुरुष टळत नाहीत. कोणत्याही परिस्थितीत, सहजपणे किंवा आगाऊ अंदाजानुसार तर नाहीच. बायकांना या मासिक त्रासाशी जमवून घेण्यावाचून पर्यायच नसतो, अखेर ते त्यांच्या अंगवळणी पडतं. या किळसवाण्या जाणिवेकडं त्या पूर्णत: दुर्लक्ष करायलासुद्धा शिकतात. पण पुरुषांना असं मनातून हद्दपार करणं जास्त अवघड असतं.

ते चिवट पुरळांसारखे असतात, कितीही प्रयत्न केला तरी न मावळणाऱ्या. कधी कधी परिस्थिती इतकी अनपेक्षितपणे चिघळते की बाई प्रोफेशनल व्यक्तीची मदत घेण्याचा गंभीरपणे विचार करते. त्याच वेळी ती हे विचार पूर्ण झटकून लावते आणि साथीचे रोग व युद्धापासून मुक्त झालेल्या सुंदर जगताचं कल्पनाचित्र रंगवू लागते. आजार आणि भांडणे, घाणेरडे मोजे आणि केसाळ छात्या. ओल्याकिच्च बाथरूम्स आणि बिअरचे उच्छ्वास. भिकार सेक्स आणि संयुक्त खाती आणि मुख्य म्हणजे, हा पुरुष. वेडं करून सोडणारा.

मधमाशांचं भडकलेलं पोळं फुटलं असेल तर त्यावरही उपाय करता येऊ शकतो... किंवा ते सहन करता येऊ शकतं... फक्त तुम्हाला ते कसं करायचं ते माहीत असायला हवं. (हुशार बाई कराकरा खाजवत नाही. तिला रक्तस्राव होत नाही आणि ती रडत नाही. ती कायम 'वर' असते. सगळ्याच्या वर...

पुरळांच्यासुद्धा आणि मग ती तिचं उर्वरित आयुष्य, तिची पाठ सोडायला तयार नसलेल्या कंडापेक्षा अधिक उपयुक्त गोष्टी करण्यासाठी स्वत:ला मोकळं करते.)

पण पुरुषाच्या बाबतीत काय करायचं?

या पुस्तकाचं प्राथमिक प्रूफ फक्त दोन स्त्रियांनी व एका पुरुषानं वाचलं होतं. चित्रपट निर्माती-रेणुका म्हणाली, ''पुरुषांनी आपल्या आयुष्यात यावं ते पूर्णत: 'पॉटी-ट्रेन्ड' आणि 'हाऊस-ब्रोकन' होऊनच. तू या पुस्तकात याबद्दल एक प्रकरण घाल ना!''

माझी संपादक-प्रिता प्रूफांवर बारकाईनं खुणा करताना, पानांतून डोकं वर काढत अगदी संक्षिप्त उद्गारली, ''डम्पिंग. यू हॅव लेफ्ट आऊट डम्पिंग.'' होय, मी केलंय तसं.

अनामिक पुरुषानं त्याच्या नेहमीच्या शांतपणे प्रतिक्रिया दिली.

''आहे,'' तो म्हणाला. ''आहे, तुझा मुद्दा बरोबर आहे.''

वेल, आभारी आहे. मलाही तसंच वाटत होतं. खरंतर 'मुद्दे' बरोबर आहेत.

ही 'प्रोफेशनल' मतं होती.

मी या पुस्तकाबद्दल सहज इतरांशी बोलले तेव्हा जणू बांधच फुटले. अनोळखी बायकासुद्धा माझ्यापाशी येऊन खुसफुसायच्या.

''दाखवा त्यांना. संपवा त्यांना. सुधारा त्यांना, हलकट साले.''

आणि मी नुसतं म्हणायचे, ''अं?''

हे पुस्तक त्यांना 'दाखवण्या'साठी किंवा त्यांना 'सुधारण्या'साठी नाही. अजिबात नाही. पुरुष ओके असतात. फक्त बायका जास्त ओके असतात इतकंच. पुरुषांना अर्थातच ते कळत नाही. तेही ओके. आम्हाला ही गोष्ट त्यांना कळायला नकोच आहे. त्यामुळं सगळ्याचाच विचका होईल. बायका विध्वंसक असतात... कावेबाज असतात. त्या चोरपावलांनी आणि मनात गुपित दडवत आपले पाय रोवतात. त्यांचं अंतरंग मोठं गुंतागुंतीचं आणि वेगवेगळं असतं, बहुतेकशा पुरुषांना ते अस्तित्वात असतं हेही माहीत नसतं.

तीच आमची ताकद असते. आणि सूड. आम्ही आमच्या मनातल्या कल्पनाचित्रांना धरून असतो. (त्यातील एक आवडतं म्हणजे जोडीदाराचा खून करणं) तोवर आयुष्य चाकोरीत छान, सुरळीत न कुरकुरता चालतं. पण जेव्हा आपण आपली स्वप्नं सोडून देऊन वास्तववादी होतो तेव्हा समस्या पृष्ठभागावर येऊ लागतात. मोठ्या समस्या. मग आपण आपल्या जोडीदाराचं पृथ:करण करू

लागतो. आपली 'अवस्था'. आपलं भवितव्य. या कशातूनच चांगलं चित्र उभं राहात नाही. राग धुमसतो, नैराश्य घेरून येतं. चकमकी झडतात. भांडणं होतात. घटस्फोट होतात. सगळी बोंबाबोंब होते. बायका काठीच्या एका टोकाला चिकटून राहतात आणि त्यांना ते पसंत नसतं. मग त्या ती काठी उचलतात आणि तिनं पुरुषांना झोडपायचा प्रयत्न करतात. आता, पुरुषांना हे आवडत नाही. असं झोडपलेलं कुणालाच आवडत नाही. अखेर याचा शेवट सगळ्यांनाच सगळ्यांचा तिरस्कार निर्माण होण्यात होतो. आयुष्य अत्यंत वैतागवाणं होऊन जातं. शेवटी स्त्रिया आणि पुरुष एकसुरात जाहीर करतात–

''लग्न बेकार असतं.''

मग पुरळ गायब होतात. एक नवा मात्र उगवतो... त्याला 'टर्मिनल एकाकीपणा' असं म्हणतात. एकाकीपण कुणालाच नको असतं. एकाकीपण कुणालाच आवडत नसतं. प्रत्येक जण 'समजंस'पणे वागायचं ठरवतो. शहाण्यासारखं. लबाडीनं? हा मार्ग आहे? तुम्ही म्हणाल, हो नक्कीच. मग काय करायचं?

''माझं 'पोस्ट-इट' छाप लग्न आहे.'' एक तिशीच्या आतली तरुणी मला सांगत होती. ''मी आणि माझा नवरा, दोघंही ढोर मेहनत करतो. आम्हा दोघांना एकमेकांना फारसं भेटताही येत नाही. मला बरेचदा रात्रभर काम करावं लागतं. तो माझ्यासाठी गोड गोड छोट्या पिवळ्या चिठ्ठ्या फ्रीजवर ठेवून जातो... मीही तेच करते. असा आमचा संसार चालतो.''

ठीक आहे. पण असं किती काळ? मला तिला सांगावंसं वाटतं की, त्या पिवळ्या चिठ्ठ्या कितीही गोड असल्या तरी त्या उबदार बिछाना आणि गरमागरम जेवण यासाठी चांगला पर्याय मुळीच नाही. हे आधुनिक, शहरी भारतातील लग्न आहे... आधुनिक, शहरी भारतीयांचं. ते वॉशिंग मशिनं आणि कॉम्प्युटर्सद्वारे बंध जोडतात. कामवाल्या ठेवून, अर्धवेळ मदत घेऊन घर चालतं. ई-मेल आणि फॅक्सद्वारे नाती सीलबंद होतात किंवा तुटतात. यामुळं बिघडत काहीच नाही... जोवर तुम्ही घटस्फोटाच्या पर्यायाचा विचार करत नाही तोवर.

डबे कोण भरतं? ''तुझं तू भरून घे.'' शिणलेली बायको गुरगुरते. ''तू माझा डबा का भरू शकत नाहीस?'' नवरा केविलवाणेपणे विचारतो. ''कारण मी तुला माझा डबा भरायला सांगत नाही.'' बायको वस्सकन खेकसते. मग नवरा बिचकतच ते काम कामवाल्या बाईला सांगतो. ती दोन पोळ्या लाटते, उरलेल्या भाज्या गरम

करून देते आणि तो डबा घेऊन जातो. पण किमान त्याची बायको दिवसभर 'पुरळमुक्त' राहते आणि कामवाल्या बाईनं भरलेला तिचा डबाही सज्ज असतो.

''तो जितके पैसे मिळवतो तेवढेच मीही मिळवते. मीही त्याच्याइतकंच उशिरापर्यंत काम करते. तो मला डिनरसाठी 'मदतीचा' हात पुढं करतो तेव्हा मला संताप येतो. 'मदत' म्हणजे काय म्हणायचं असतं त्याला? हा शब्द तर भलताच उद्दाम आहे. म्हणजे डिनर बनवणं ही सर्वस्वी माझीच जबाबदारी आहे असं तो गृहित धरतो हेच यातून स्पष्ट होतं... आणि तो माझा भार थोडा हलका करण्यासाठी सहृदयतेनं मला मदत करणार असतो. बुलशीट. आम्हाला दोघांनाही स्वत:चं पोट भरायचं असतं. माझ्यापुरतं सांगायचं तर तो त्याचं बघतो आणि मी माझं. हे संयुक्तरीत्या करायचं असतं. त्यात उपकार नकोत.''

उपकार नकोत? या बाईला मदतीची गरज आहे. या बाईला या पुस्तकाची गरज आहे.

'सर्व्हाइव्हिंग मेन' या पुस्तकात पुरुषांची (व स्त्रियांचीही) गुपिते प्रकट होतील, ती वाचत असताना तुम्ही मनाची कवाडं उघडी ठेवा असं मी सुचवेन.

आपल्याला अतिशय साध्या-सोप्या गोष्टींमधून काहीतरी विलक्षण घडवायला आवडतं. म्हणजे... म्हणजे आपल्याला शिरस्त्यानुसार बदडणारा पुरुष... आपल्याला त्याबद्दल 'बोलायला' आवडतं. आपण नुसती तक्रार करून हा सगळा विषय बाजूला सारत नाही आणि पुरुषांनाही!

तुम्हाला जर बाईची अनुवंशशास्त्रानुसार रुजलेली, बोलण्याची, आणखी बोलत राहण्याची, खरंतर, बोलणं कधीच न थांबवण्याची... जेवणखाण, झोप, प्रणय या साऱ्याविना... गरज समजत असेल तर तुम्हाला या पुस्तकामागचं सयुक्तिक कारण म्हणजेच 'रेझॉन्देत्र' लक्षात येईल.

पुरुष इतकं बोलत नाही. कदाचित ते क्षुद्र वृत्तीचे... शब्दांच्या बाबतीतसुद्धा असल्यामुळं असेल.

सगळेच पुरुष चिक्कू असतात? अं... सामान्यत: असतात. कारण पुरुष मनातल्या मनात किंवा थोडं उघडही असं मानतात की, सगळ्या बायका त्यांना फसवणार असतात. त्यांच्यापेक्षा कितीतरी जास्त पैसे मिळवणाऱ्यासुद्धा. एखाद्या बारमध्ये एखाद्या माणसाशी बोलून बघा. (होय, सध्याच्या काळात यात काही गैर नाही. बारमध्ये सगळे जण पुरुषांशी बोलत असतात-पुरुषसुद्धा.) बोलण्याच्या ओघात कधी ना कधी तो तुम्हाला त्याच्या आर्थिक समस्या सांगेलच. तो जर

विवाहित असेल तर तो भुवयांची चुळबूळ करेल... पुरुष त्यांच्या बायकोबद्दल बोलताना करतात तशी. (हे ती सुंदर आहे, पण मूर्ख... हे दाखवण्यासाठी असतं, किंवा तितकी सुंदर नाही पण बॉसगिरी करते हे दाखवण्यासाठी) आणि 'मला तुमचं माहीत नाही, पण माझी बायको घासाघीस करण्यात पटाईत आहे... कशातही. गेल्याच आठवड्यात तिनं चाळीस किलो धुण्याचं साबण विकत आणलं. स्वस्त पडलं म्हणून. पण आत्ता मला त्यासाठी पैसे मोजावे लागले त्याचं काय?' अशासारखं बोलू लागेल.

होय, पैसा म्हणजे ताकद हे माहीत आहे आम्हाला. ज्या व्यक्तीच्या हातात पर्सच्या दोऱ्या, ती व्यक्ती कळसूत्री बाहुल्यांचा महान सूत्रधार असते. जर बायको पैसेवाली असेल तर ती नवऱ्याला पॉकेटमनीसाठी हात पसरायला लावते.

एक चित्रकार मैत्रीण तिच्या लग्नबंधनातील पूर्णत: बदललेल्या भूमिकांबद्दल प्रसन्न चेहऱ्यानं सांगते.

''माझा नवरा कितीतरी वर्षं मला काही हजार रुपयांसाठी रांगायला लावायचा. तो मला पैन् पैचा हिशोब मागायचा आणि मला अगदी सटरफटर खरेदीचीसुद्धा कारणं द्यायला लावायचा. वेल, आता मी यशस्वी कलाकार आहे आणि तो माझा मॅनेजर. आता बॉल गेम बदलला आहे. तुला सांगते, मी त्याला रात्री जेवायला वाढण्यासाठी खरोखर ढोरमेहनत करायला लावते.''

पुरुष आणि त्यांचा पैसा परस्परांपासून क्वचितच दूर असतात. त्यांना त्यांच्या पाकिटांत नोटांच्या गड्ड्या कोंबताना बघा. बँकेच्या त्या करकरीत नोटांबद्दल बोलताना त्यांच्या हनुवटीवरून ओघळणारी लाळ आणि त्यांच्या डोळ्यांतील पिसाळलेले भाव बघा. तुम्हाला त्यांच्या पाठीवर हात ठेवून सांगावंसं वाटतं की, ''हेऽ रिलॅक्स. हा फक्त कागद आहे.'' ते त्यांना समजेल असं नाही. पैसा पुरुषांसाठी कामोद्दीपकाचं काम करतो. महिन्याच्या सुरुवातीला खिसे भरलेले असतात तेव्हा पुरुष सर्वाधिक कामोत्तेजित का असतात हे यावरून लक्षात येईल. जसजसा खर्चाचा डोंगर वाढत जातो आणि बँकखातं आकसतं तशी ही विषयवासना कमी होऊ लागते. बायकांना हे समजतं. त्यांनाही पैसा तितकाच प्रिय असतो. विशेषत: त्यांच्या जोडीदाराचा.

या स्वभाववैशिष्ट्याला फार थोडे पुरुष प्रोत्साहन देतात. जे देतात, ते संपतात. याचा अर्थ बायकांना पैशाची व्यवस्था नीट पाहता येत नाही असा नाही. त्या हे कामही उत्तमरीत्या करतात. फक्त त्यांना त्याबाबत कुठलेही प्रश्न विचारायचे

नाहीत. दुर्दैवाची गोष्ट म्हणजे, पुरुष त्यांच्यावर तितका विश्वास ठेवत नाहीत. पुरुषांना बायकांच्या ताब्यात द्यायला न आवडणाऱ्या दोन विशिष्ट गोष्टी म्हणजे- पैसा आणि त्यांचं गुप्तांग. पुरुष दोन्हींचंही जीवाच्या आकांतानं रक्षण करतात. यासाठी ते इतक्या थराला जाऊ शकतात की, समोरून झालेला हल्ला चुकवण्यासाठी ते बेडवर झोकून देऊन पालथे पडू शकतात. गुप्तांगाचा संसर्ग/इजा झालेले पुरुष बाईला त्या जखमेची मलमपट्टी करू देण्यापेक्षा वंध्यत्वाचा धोका पत्करेल. त्यामुळं पुरुषाच्या दोन्ही पायांमध्ये पैशाची थैली लोंबत असते... परभक्षी, हावऱ्या बायकांच्या इकडंतिकडं भटकणाऱ्या बोटांपासून जपून ठेवलेली असते. एक दमडी गमविण्याची वेळ आली तर पुरुष मरणाला आमंत्रण देतील आणि तुम्हाला माहीत आहे का... बहुतेकशा बायका त्यांना थांबवणारही नाहीत... फक्त ती दमडी त्यांच्या इवल्याइवल्या आकर्षक हाताला लागायला हवी!

मूलभूत अर्थशास्त्र समजून घेण्याच्या बाबतीत बायका बेकार असतात अशीही पुरुषांची खात्री असते. हे विवाहित व अविवाहित दोघांनाही लागू होतं. एखादा अविवाहित माणूस जेव्हा ''नीलम ना इतकी... इतकी...'' आहे असं म्हणतो तेव्हा तो त्याच्या गर्लफ्रेंडचे लाडिक हट्ट पुरवतोय असं वाटू शकेल. (तो खरं तर 'बिनडोक' म्हणण्यासाठी तळमळत असतो, पण तो तसं उघड म्हणत नाही.) तो म्हणतो, ''तिला मार्केटमधील अजिबात काही कळत नाही.'' अशा वेळी तो विषय तिथंच सोडणं. 'कोणत्या मार्केटमधलं? अर्थविषयक की क्रॉफर्ड?' अशा खोलात न शिरणं उत्तम असतं. कारण जर तुम्ही आणखी काही टोकरलंत तर तुम्हाला नीलम आणि तो खरेदीला-कार/गॅस यांची मालिका/चार दारांचा रेफ्रिजरेटर/आफ्टर-शेव्ह/चड्ड्या... अशा कशाच्याही-गेले होते तेव्हा काय झालं यावर वीस मिनिटांचा एकपात्री प्रवेश ऐकावा लागण्याची शक्यता अधिक आणि तुम्हाला त्यात सापडायचं असणार नाही हे नक्की.

पुरुषांना बायकांना भीक दिल्यासारखे पैसे द्यायला आवडतं. त्यामुळं त्यांना फार दिलदार व दानशूर असल्यासारखं वाटतं. त्यामुळं ते अगदी नीच-हलकटसुद्धा दिसतात, पण ते 'घरखर्चाचे' पैसे देत असतात तेव्हा सहसा आरशासमोर उभे राहात नाहीत. बायकांना हे प्रसंग अजिबात आवडत नाहीत... आणि पुरुषांना प्रचंड आवडतात.

अशा वेळी उट्टे काढण्याचा फक्त एकच मार्ग असतो-त्या साल्याला गंडवा. इव्हाना ट्रम्पच्या पुस्तकातील काही भाग घेण्यासारखा आहे. जेव्हा चिप्स डाऊन